**CNR No.:MHSN020023292023**

## विशेष दिवाणी दावा क्र.५४४/२०२३ मधील
## नि.६६ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ यांनी कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी सादर केलेला आहे.

२. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ हा अज्ञान असून प्रतिवादी क्र.१ त्याचा अज्ञानपालनकर्ता आहे. अज्ञान प्रतिवादी क्र.२ चे नावे दावा मिळकत आहे. त्यांनी कैफियत दाखल करण्यास जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. अज्ञान प्रतिवादीचे हित जपणेसाठी त्यांना कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. वादीने नि.क्र.६७ वर म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी विलंबाचे संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. तिने याकामी पुरावा दाखल केलेला असून प्रतिवादींचे विरूध्द उलटतपास नाही चा आदेश झालेला आहे. प्रतिवादी हे प्रकरण चालविणेस तत्पर नाहीत. प्रतिवादी हे जाणीवपूर्वक प्रकरण लांबविणेचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून तिने अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. उभयपक्षाचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ हा अज्ञान असून प्रतिवादी क्र.१ त्याचा अज्ञानपालनकर्ता आहे. अज्ञान प्रतिवादी क्र.२ चे नावे दावा मिळकत आहे. त्यांनी

कैफियत दाखल करण्यास जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. अज्ञान प्रतिवादीचे हित जपणेसाठी त्यांना कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे गरजेचे आहे. प्रतिवादींच्या कथनास त्यांचे शपथपत्र पुष्टी देणारे आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता अज्ञान प्रतिवादीचे हक्क अबाधीत ठेवण्याकरीता तसेच दावा गुणवत्तेवर निकाली काढणेकरीता न्यायाचे दृष्टीने त्याला कैफियत दाखल करणेस परवानगी देणे उचित होईल. तथापी प्रतिवादी हे दि.१०/०१/२०२४ रोजी याकामी हजर झालेले आहेत. तरीदेखील प्रतिवादींनी विहीत मुदतीत कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे प्रकरण प्रलंबित राहिल्याने वादीचा बराच वेळ खर्च झालेला आहे. सबब प्रतिवादींनी वादीस रक्कम रु.१,०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) खर्च देणे आवश्यक आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादींनी वादीस रक्कम रु.१०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) आज रोजी खर्च दयावा .

SHAKTI UTTAMRAO DESHMUKH

Digitally signed by SHAKTI UTTAMRAO DESHMUKH
Date: 2025.12.18 17:00:04 +0530

सांगली. (श. उ. देशमुख)

दि.१८/१२/२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***K. U. Nadaf*** |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli. |
| Date of order/judgment | : | 18/12/2025 |
| Signed by the Presiding Officer on | : | 18/12/2025 |
| Uploaded on | : | 18/12/2025 |